# १३. यशवंतराव चव्हाण यांचे अस्पृश्यताविषयक विचार व कार्य

**Dr. Tardalkar Sandeep Sambhaji**
HOD, Department of History, T. C. College, Baramati

यशवंतरावांना ७१ वर्षांचे (१२ मार्च १९१३ ते २५ नोव्हेंबर १९८४) आयुष्य लाभले. पैकी ५५ वर्षे त्यांनी सार्वजनिक जीवनात व्यतीत केली. अनेक वर्षे ते प्रत्यक्ष सत्तेत होते किंवा त्यांचा पक्ष सत्तेत होता. अशा व्यक्तींचा जसा राजकारणावर, अर्थकारणावर प्रभाव पडतो त्याचप्रमाणे सामाजिक जीवनावर देखील प्रभाव पडतो. म्हणून यशवंतरावांची सामाजिक भूमिका पाहणे आवश्यक ठरते. या शोधनिबंधाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीबद्दलचे, प्रामुख्याने अस्पृश्यता परिस्थितीबद्दलचे यशवंतरावांचे आकलन काय होते आणि या सामाजिक परिस्थितीत सुधारणा करायच्या असतील तर शासनकर्त्यांनी धोरणे आखली पाहिजेत याबद्दलच्या त्यांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला आहे.

भारताच्या सामाजिक परिस्थितीबाबत यशवंतरावांनी सखोल व गंभीर विचार केलेला आहे. जानेवारी १९६८ मध्ये दिल्ली येथे अभ्यासवर्गासमोर भाषण करताना सामाजिक क्षेत्रातील आव्हानांविषयी ते म्हणतात, "... अगदी आजही जाती, पोटजाती, धर्म, प्रदेश, भाषा, बोली, अशा एक ना दोन अनेक गोष्टींमुळे आपण विभागले गेलो आहोत. या विभाजक प्रवृत्तींमुळेच भारत इतिहासात प्रदीर्घ काळ परकीय अमलाखाली गांजला व भरडला गेला. या प्रवृत्ती आजही कार्यप्रवण आहेत, एवढेच नव्हे तर त्या वाढत आहेत, अधिकाधिक तीव्र बनत आहेत असे दृश्य दिसते." यावरून अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे ते कशा तऱ्हेने पाहतात हे स्पष्ट होते.

**विद्यार्थी दशेतील अस्पृश्यांच्या प्रश्नांचे आकलन व कार्य**

लहानपणापासूनच यशवंतरावांचा अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आपुलकीचा होता असे दिसते. 'कृष्णाकाठ' या आपल्या आत्मचरित्रात, लहानपणीच्या गावातील आठवणी सांगताना ते लिहितात, '.....एक गोष्ट मात्र सांगितली पाहिजे, की ह्या सर्व समाजापासून दूर व गावाबाहेर राहणाऱ्या महार, मांग, चांभार या मंडळींना गावाशी फार कमी संपर्क असे. आणि तो असे, तो काही, ज्या माणुसकीचे मी फार कौतुक केले, तिच्याशी सुसंगत होता, असे म्हणता येणार नाही. आज दलितांचा प्रश्न म्हणून आपण ज्या प्रश्नाकडे पाहत आहोत, तो दलित समाज तेव्हा या गावगाड्याच्या बाहेर जे एक वेगळे जीवन जगत होता, त्याला जीवन हे नाव द्यावे की नाही, हाही एक वेगळा प्रश्न आहे.' अस्पृश्यांच्या प्रश्नांची जाणीव लहान वयातच यशवंतरावांना झाली होती हे यावरून लक्षात येते.

विद्यार्थीदशेत यशवंतरावांनी काँग्रेसप्रणीत राष्ट्रीय चळवळीत भाग घ्यावयास सुरुवात केली. या काळात काँग्रेस, गांधी, नेहरू या नेत्यांचा प्रभाव होता. यशवंतरावांनी काँग्रेसच्या या प्रमुख नेत्यांच्या मार्गदर्शनानुसार राजकीय-सामाजिक कार्य करावयास सुरुवात केली. कायदेभंग चळवळीचा जोर ओसरल्यावर गांधीजींनी अस्पृश्यांच्या सेवेवर आपले लक्ष केंद्रीत केले. त्यादृष्टीने गांधीजींनी अस्पृश्यांच्या मंदिर-प्रवेशाची चळवळ सुरू करण्याचा आदेश दिला. गांधीजींचा, अस्पृश्यांच्या मंदिर-प्रवेशाचा कार्यक्रम प्रतिकात्मक म्हणून यशवंतरावांना बरोबर आहे असे वाटत होते. 'समाजाच्या सर्व शाखांना एका मुख्य प्रवाहात आणायचे असेल त